माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ३१२/२०२२**

**अपिलार्थी, श्री. नरेश वासुदेव ठाकरे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
सिताबर्डी विभाग, नागपूर शहर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
परिमंडळ क्र.२, नागपूर शहर

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०३.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित (प्रतिनिधी)** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित (प्रतिनिधी)** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१२.२०२१ | ३०.१२.२०२१ | ०६.०१.२०२२ | ३१.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १८.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " अपराध क्र. ३९/२०२१ पोलीस स्टेशन धंतोली या गुन्हा मध्ये सहायक पोलीस आयुक्त (I.O.) यांनी नरेश वासुदेव ठाकरे यांचे बँक अकाऊंट स्विच (बंद) केले आहे. चौकशी अधिकारी A.C.P. यांना बँक अकाऊंट न्यायालयाच्या आदेशाशिवाय बंद करण्याचे अधिकार आहे काय असेल त्या आदेशाची कॉपी मिळण्याबाबत " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागणी केल्याप्रमाणे पो.स्टे. धंतोली नागपूर येथे दाखल अप क्र.३९/२०२१ या गुन्हयाचा तपास सुरु आहे. गुन्हयामध्ये आपण बँक अकाऊन्ट बंद (स्विच) केलेबाबत व मा. न्यायालयाच्या आदेशाशिवाय बंद करण्याचे अधिकार आहे काय? ही माहिती मागणी प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. एखाद्या कार्यवाही मागील कारणे/खुलासा, प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती या प्रक्रियेचा अथवा या स्वरुपातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) नुसार माहितीच्या व्याख्येत समावेश होत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०६.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक ३१.०१.२०२२

अन्वये, अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिलेल्या अर्जाच्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली माहिती संयुक्तिक व योग्य असल्याने प्रस्तूत अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे आदेशित केले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०४.०२.२०२२ रोजी** " मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ११.०३.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्रीमती ममता पाटील, नायब पोलीस शिपाई उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे पोलीस उपनिरीक्षक एस.बी. जाधव उपस्थित आहेत.

आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी हे उपस्थित नाही. मात्र त्यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ, ब व क यात मागणी केलेली माहिती म्हणजेच अपराध क्र. ३९/२०२१ पोलीस स्टेशन धंतोली या गुन्हा मध्ये सहायक पोलीस आयुक्त (I.O.) यांनी नरेश वासुदेव ठाकरे यांचे बँक अकाऊंट स्विच (बंद) केले आहे. चौकशी अधिकारी A.C.P. यांना बँक अकाऊंट न्यायालयाच्या आदेशाशिवाय बंद करण्याचे अधिकार आहे काय? असेल त्या आदेशाची कॉपी याबाबतची विचारणा केलेली असल्याचे आढळून येते. याबाबतीत प्राधिकरणाच्या वतीने दाखल केलेल्या लेखी खुलाश्यात अपिलार्थी श्री. नरेश ठाकरे यांनी दिनांक १२.११.२०२१ रोजी सहायक पोलीस आयुक्त कार्यालय, सिताबर्डी विभाग नागपूर येथे अर्ज दाखल केला आहे. त्यात पोलीस स्टेशन धंतोली येथील अप क्र. ३९/२०२१ कलम ३८४, ३८६, ३६४(अ), ३२३, ५०४, ५०६(२), ४२०, १२०(ब), ३४ भादंवि, सहकलम सावकारी अधिनियम २०१४ चे कलम ४३, ४४,४५, ४६ सह कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ या गुन्हाच्या तपासात बंद केलेले बँक अकाऊन्ट पुन्हा चालु करण्यासाठी पत्र दिलेले आहे. अपिलार्थी हे नमूद गुन्हयात आरोपी असून यात अपिलार्थी हे सध्या जामिनावर बाहेर असून तपासात हस्तक्षेप होणार नाही व साक्षीदारांवर दबाव येणार नाही या अटीवर अपिलार्थीचा जामिन झालेला आहे. त्यामुळे नमूद गुन्हयाच्या तपासात हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यामुळे नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान बंद करण्यात आलेले बँक अकाऊन्ट सुरु करण्याची परवानगी देता येणार नाही, असे यात सुचीत केले आहे.

तसेच आज सादर केलेल्या लेखी उत्तरात विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती संयुक्तिक व योग्य असल्याचे तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष योग्य असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शी सुसंगत असल्याचा पुर्नऊचार केलेला आहे. प्रस्तूत प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील **कलम २(च) नुसार माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज अभिलेख, ज्ञापने, ई-मेल,** अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, अहवाल नमुने, कागदपत्रे, कोणतीही ईलेक्ट्रॉनीक स्वरुपातील आधार सामग्री इत्यादीचा समावेश होतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलाशा अथवा

कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही.

वरील माहितीच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी सादर केलेल्या जोडपत्र-अ यात प्रश्नार्थक स्वरुपात माहितीची मागणी केली असून एखाद्या विशिष्ट पध्दतीने कार्यवाही करणे अथवा एखाद्या कार्यवाही मागील कारणे/खुलासा, कारणमिमांसा जाणून घेणे, प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागणे इत्यादी बाबी माहितीचा अधिकार कायद्याच्या कार्यकक्षेच्या बाहेर असल्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व पारीत केलेला आदेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) च्या तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी दाखल केलेला व्दितीय अपील अर्ज तथ्यहिन असल्यामुळे फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★नागपूर★

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.०३.२०२४**

जावक क्रमांक 1967 दिनांक 1 APR 2024